# प्रकरण चौथे

# महाराष्ट्रातील प्रमुख राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष

## प्रकरण चौथे

# महाराष्ट्रातील प्रमुख राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष

४.१ प्रस्तावना

४.२ महाराष्ट्रातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष

४.२.१ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस

४.२.२ भारतीय जनता पक्ष

४.२.३ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

४.३ महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्ष

४.३.१ शिवसेना

४.३.२ महाराष्ट्र नवनिर्माण सेना

४.३.३ रिपब्लिकन पक्ष

४.३.४ शेतकरी-कामगार पक्ष

संदर्भ सूची

## ४.१ प्रस्तावना :-

भारतीय स्वातंत्र्यानंतरच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या रूपाने एक अत्यंत मूलगामी घटना घडली. यामुळे महाराष्ट्राचे राजकारण, समाजकारण केंद्रित झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे गमक म्हणजे महाराष्ट्र राज्याची निर्मिती होय. तत्कालीन काँग्रेस सरकारच्या भाषावार प्रांतरचनेच्या नकारातून हे आंदोलन उभे राहिले होते. सरकारविरुद्ध जनता अशा मोठ्या संघर्षामध्ये जनतेचा विजय होऊन १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. संसदीय शासन पद्धतीत राजकीय पक्षाला महत्त्व असल्याने ते लोकांचे प्रतिनिधित्व संसदेत व राज्य विधिमंडळात करतात. महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातही अनेकविध राजकीय पक्ष अस्तित्वात असून ते आज सक्रियपणे कार्य करत आहेत.

अखिल भारतीय पातळीवर महाराष्ट्रात उदय पावलेल्या प्रादेशिक पक्षांनी अखिल भारतीय राजकीय पक्षांशी युती करून प्रभावित केलेले राष्ट्रीय पातळीवरील राजकारण आपणास आज पाहावयास मिळते. महाराष्ट्र राज्य राजकारणाला आजच्या घडीला महत्त्वपूर्ण स्थान अवगत झाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचे अध्ययन करताना महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेला प्रभावित करणाऱ्या राजकीय पक्षांचे अध्ययन करणे जिकिरीचे आहे. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात येण्यापूर्वीपासूनच पक्ष पद्धतीचा प्रारंभ येथे झाला होता. राष्ट्रीय महासभा (काँग्रेस), हिंदू महासभा, प्रति सरकार पक्ष, डॉ. आंबेडकरांचा स्वतंत्र मजूर पक्ष याचे रूपांतर पुढे शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, भारतीय कम्युनिस्ट पक्ष असे विभिन्न पक्ष कार्यरत होते. महाराष्ट्रात राजकीय पक्ष व प्रादेशिक पक्षांचे राजकारण महाराष्ट्र स्थापनेपासून आजपर्यंत अनेक दशके प्रवर्तन व परिणामाचे साक्षीदार राहिले आहेत.

महाराष्ट्रात १९५६-५७ पासून पक्षीय राजकारणाचा जो विकास झाला त्याला राष्ट्रीय पातळीवरची काँग्रेस वर्चस्वाची पार्श्वभूमी लाभली होती. १९७७ मध्ये प्रथम

महाराष्ट्रात कॉंग्रेसला धक्का बसला याला जबाबदार राष्ट्रीय राजकारण होते. बहुलक्षवादी राजकारण आणि इंदिरा गांधी यांची एकाधिकारशाही यामुळे महाराष्ट्रातील कॉंग्रेस व्यवस्थेला तडे जाण्यास १९७२ पासून सुरूवात झाली होती. १९८० मध्ये पुन्हा कॉंग्रेस केंद्रात सत्तेवर आली, राष्ट्रीय राजकारणाप्रमाणेच महाराष्ट्रातही कॉंग्रेसी प्रभुत्व निर्माण झाले. १९९० ते १९९६ या काळात महाराष्ट्रातील द्विध्रुवीय राजकरणाला छेद देत तिसऱ्या आघाडीचे राजकारण सुरू झाले. शिवसेना-भाजप यांच्या उदयामुळे जे पक्ष सिमान्त ठरले त्यांनी सतत तिसऱ्या आघाडीचे राजकरण केले. पक्षीय स्पर्धा जरी द्विध्रुवीय चौकटीत चाललेली वाटत असली तरी १९९९ नंतर महाराष्ट्रीय पक्षीय राजकारण मूलतः बहुध्रुवीय बनले. शेकाप, जनता दल, भारिप बहुजन महासंघ, भारतीय रिपब्लिकन पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जनसुराज्य पक्ष, बहुजन समाज पक्ष, समाजवादी पक्ष, शिवसेना इत्यादी प्रादेशिक पक्षाच्या उदयामुळे महाराष्ट्रात द्विध्रुवीय राजकारणाला तडा जात आहे.

कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेना हे चार पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात मध्यवर्ती भूमिका बजावत असले तरी ही इतर पक्षांचे सक्रिय राजकारणसुद्धा महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील राजकारण हे या पक्षाभोवती फिरत आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांचे विवरण आम्ही स्पष्ट करत आहोत ते पुढीलप्रमाणे आहे. तसेच वर्तमान काळातील राजकारण हे आघाडीचे राजकारण म्हणून उदयास आले आहे. एकूणच महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतीचे स्वरूप दृष्टिक्षेपात घेतल्याशिवाय येथील राजकारणाची मीमांसा करता येत नाही. म्हणूनच महाराष्ट्रातील पक्ष पद्धतीचे विवरण पुढीलप्रमाणे अभ्यासता येते.

## ४.२ महाराष्ट्रातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष :-

### ४.२.१ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष :-

सद्यस्थितीला महाराष्ट्र हा फार पूर्वीपासून काँग्रेसची कर्मभूमी लाभलेला महाराष्ट्र आहे. ''इ.स. १९६४ मध्ये रजनी कोठारी यांनी भारतीय राजकीय व्यवस्थेचे वर्णन ''काँग्रेसी व्यवस्था' असे केले होते. १८८५ मध्ये मुंबई शहरात इंडियन नॅशनल काँग्रेस किंवा राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस ही एक राष्ट्रीय चळवळ होती. या चळवळीचे नेतृत्व तत्कालीन कालखंडात मुंबई प्रांतातील अनेक दिग्गजांनी केले होते. यामध्ये लोकमान्य टिळक, महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादींनी काँग्रेसची समर्थ पायाभरणी केली. मवाळ व जहाल अशा दोन्ही कालखंडात काँग्रेसचे नेतृत्व महाराष्ट्रीयन मंडळीनीच केले होते.''[१] पुढे १९४८ मध्ये राष्ट्रीय सभेचे एका राजकीय पक्षात रूपांतर झाले.

१९५५ नंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी व मराठी भाषिकांच्या स्वतंत्र व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी चळवळ उभी राहिली. यशवंतराच चव्हाण यांच्या नेतृत्वामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ अधिक गतिमान झाली. याचा परिपाक म्हणून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. ''१ मे १९६० रोजी महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर काँग्रेसच्या राजकारणाचे नवे पर्व सुरू झाले. प्रबल जाती असलेल्या मराठा-कुणबी समूहाच्या संख्यात्मक बळावर राजकीय सत्तेवर नियंत्रण प्रस्थापित झाले. श्रीमंत शेतकऱ्यांचे हितसंबंध जपून राजकारणावर पकड मजबूत करण्याचे धोरण आणि स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्थांत आपली सत्ताकेंद्रे स्थापन करून काँग्रेसने आपल्या महाराष्ट्रातील राजकारणाला गती दिली. काँग्रेसने प्रारंभापासूनच 'बहुजन समाजाची सत्ता' अशी वैचारिक मांडणी करून आपले सत्ताकारणही यशस्वी केले.''[२] काँग्रेसने १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीपासून ते २००९ पर्यंत दीर्घकाळ सत्ता उपभोगली आहे. याला अपवाद फक्त १९७८ ते १९८० च्या काळातील पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार

आणि १९९५ ते १९९९ च्या कालखंडातील शिवसेना-भाजप युतीचे सरकार राहिलेले आहे. १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या विदेशी नेतृत्वाला विरोध करत शरद पवारांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला विरोध करून स्थापन झालेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा १९९९ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर काँग्रेसशी आघाडी करून सत्तेत सहभागी झाला.

''औपचारिकरीत्या महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० मध्ये झाली असली तरी महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वाची चौकट मात्र त्यापूर्वीपासून खरेतर १९३० सालापासूनच साकारत गेली. १९५० मध्ये एकत्रित द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी खऱ्या अर्थाने काँग्रेस वर्चस्वाची जडणघडण केली व महाराष्ट्रातील काँग्रेसचे वैशिष्ट्यपूर्ण प्रारूप 'चव्हाण मॉडेल' म्हणून प्रसिद्ध झाले. 'बेरजेचे राजकारण' आणि 'बहुजन समाजाचे राजकारण' म्हणूनही काँग्रेसचे सुरुवातीचे काळातील राजकारण प्रसिद्ध आहे. हे राजकारण यशस्वी होण्यामागे निरनिराळे सामाजिक-आर्थिक, संस्थात्मक व वैचारिक घटक कारणीभूत होते.''[३] मराठा नेतृत्व, बहुजन समाजाच्या आधारावर त्याला मिळालेले वैचारिक, सांस्कृतिक पाठबळ, संस्थात्मक आधार आणि विसंगत आर्थिक हितसंबंधाचा काँग्रेसचा सांधेजोडपणा या चौकटीत काँग्रेस पक्षाचे प्रादेशिक राजकारण साकारले. १९८० नंतर काँग्रेसची चौकट निरनिराळ्या पातळ्यांवर ढिली पडली. त्यानंतर महाराष्ट्राच्या काँग्रेसच्या राजकारणावर त्यांची पकड सैल होत गेली.

**काँग्रेसी गटबाजीचे राजकारण :-**

१९७१-७२ मध्ये महाराष्ट्रातील मराठा नेतृत्वाखालील काँग्रेसची सत्ताचौकट बदलण्याचे कार्य प्रथम इंदिरा गांधींनी केले. महाराष्ट्रातील नेत्यांनी इंदिरा गांधीच्या नेतृत्वाला विरोध करण्याची भूमिका घेतली होती याचा परिणाम म्हणून आपल्या संघटनात्मक राजकारणाचा एक भाग म्हणून इंदिरा गांधी यांनी स्थानिक, प्रभावी, मराठा

नेत्यांचे खच्चीकरण करण्याची योजना राबविली आणि मराठा नेतृत्वामधील वर्चस्व कमी केले. ''१९७८ मध्ये इंदिरा गांधींचे नेतृत्व मानण्याच्या प्रश्नावरून काँग्रेसमध्ये फूट पडली आणि महाराष्ट्रात रेड्डी काँग्रेस व इंदिरा काँग्रेस असे दोन गट निर्माण झाले. महाराष्ट्रात ते दोन गट खरे तर मराठा आणि मराठ्यांना आव्हान देऊ पाहणाऱ्या बिगर मराठा गटांचे प्रतिनिधित्व करीत होते. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीनंतर या दोन काँग्रेसचे संयुक्त मित्रमंडळ सत्तेवर आले. परंतु या दरम्यान शरद पवार यांनी समाजवादी काँग्रेस हा नवा प्रादेशिक गट स्थापन केला आणि काँग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ बरखास्त करीत पुरोगामी लोकशाही दलाचे पहिले बिगर काँग्रेसी सरकार सत्तेवर आले.''[४] शरद पवार यांचे पक्षांतर्गत बंड काँग्रेस पक्षातील खळबळीचे केवळ एक दृश्य रूप होते. एकीकडे या बंडाला मराठा नेतृत्वातील गटबाजीची पार्श्वभूमी होती तर दुसरीकडे काँग्रेसच्या राष्ट्रीय राजकारणाची.

''१९७५ ते १९८८ या काळात महाराष्ट्रात आठ वेळा मुख्यमंत्री बदलले. या मागे इंदिरा गांधीचे राजकारण जसे कारणीभूत होते तशीच काँग्रेसची अंतर्गत गटबाजी देखील महाराष्ट्रातील काँग्रेसी व्यवस्थेला खिंडार पडल्याची लक्षणे या काळातील राजकारणात स्पष्टपणे उमटलेली दिसतात. काँग्रेस पक्षाच्या निरनिराळ्या गटांतील निवडणुकीच्या राजकारणात यश मिळवून औपचारिक पातळीवर सत्ता या काळात कशीबशी काबूत ठेवली मात्र काँग्रेस पक्षाच्या संघटनेत या कालावधीत मोठीच खळबळ माजलेली दिसते. मराठा नेतृत्वाच्या मर्यादा या गटबाजीतून उघड झाल्या तसेच काँग्रेसचे निरनिराळ्या हितसंबंधांना सांभाळणारे समावेशक राजकारण हीबदलत्या परिस्थितीत तग धरू शकणार नाही हेही या काळात स्पष्ट झाले.''[५] शिवसेना व भाजप यांच्या 'हिंदुत्वा'च्या आवाहनापुढे तसेच 'बहुजनाच्या' जातीवर आधारित स्वतंत्र राजकारणाच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील काँग्रेसला आपली मूळची शिदोरी अपुरी पडू लागली आणि

त्यामुळे १९८१ च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्रात एका नव्या स्वरूपाची पक्ष पद्धती व नव्या स्वरूपातील काँग्रेसची पायाभरणी केली गेली.

१९९० च्या दशकातील काँग्रेसला काँग्रेसप्रणीत आघाडीला मध्यवर्ती स्थान असणारी परंतु काँग्रेस नसणारी एक द्विपक्ष पद्धती महाराष्ट्रात साकारली गेली. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या राजकारणाचा तिसरा टप्पा या स्पर्धात्मक पक्ष पद्धतीत साकारलेला दिसतो. नव्वदीतील राजकारणाची नांदी घडवली ती या दोन लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या १९९० सालच्या विधानसभा निवडणुकीने या निवडणुकात भाजपा-शिवसेनेने ९४ जागा जिंकून काँग्रेसला पराभवाचा धक्का दिला. प्रामुख्याने शहरी भागांत काँग्रेसची मते घटल्याचे चित्र या निवडणुकीत आढळले. १९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निर्मितीनंतर मात्र शेतकऱ्यांच्या पाठिंब्यासाठी दोन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू झाली व त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस मोठ्या प्रमाणावर यशस्वी ठरली. १९९५ ते १९९९ दरम्यान काँग्रेस पक्षाच्या या विभागातील जागा व मते झपाट्याने कमी झालेली दिसतात.

निवडणुकीतील यशापयशाच्या दृष्टिकोनातून यशवंतराव चव्हाण यांचा तसेच वसंत दादाचा अस्त आणि शरद पवारांना काँग्रेसअंतर्गत नेतृत्व प्रस्थापित करण्यात आलेले अपयश यामुळे काँग्रेस पक्ष संघटनेची वाताहत परकोटीला पोहचली. निरनिराळ्या स्थानिक नेत्यांची बेरीज म्हणजे महाराष्ट्रातील काँग्रेस असे समीकरण बनले. स्थानिक पातळीवरदेखील काँग्रेस पक्षाचे सर्व समावेशक स्वरूप हळूहळू लोप पावत गेलेले दिसते. त्या ऐवजी जातीचे पैशांचे व कौटुबिक प्रभुत्वाचे राजकारण काँग्रेसमध्ये साकारत गेलेले दिसते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर, काँग्रेसमधील पक्ष संघटनेची स्थिती अधिक दयनीय स्वरूपाची झालेली दिसते. ''२००४ मध्ये राज्यात आणि केंद्रातही सत्ता मिळाल्यानंतर पक्षाच्या या स्थितीत फारसा फरक पडलेला नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी अपरिहार्यपणे युती करणे काँग्रेस पक्षाला भाग पडले असले तरी या

युतीविषयी कायम धरसोडीची, साशंकतेची भूमिका पक्षाने घेतली. या कारणामुळे सध्यकालीन स्थितीत एक समर्थ राजकीय पक्ष म्हणून बहुल पक्ष पद्धतीत वावरण्याची काँग्रेसची शक्यता जवळपास लोप पावलेली दिसते. काँग्रेसच्या पक्ष संघटनेच्या या विस्कळीत स्वरूपामुळे डाव्यातील एकंदर पक्ष व्यवस्थेतील विस्कळीतपणा वाढून तिच्यासमोरील पेचप्रसंग अधिक गडद बनला आहे.''[६] आजही प्रस्थापित लोकशाही राजकारणात ज्यांचे प्रतिनिधित्व केले जाऊ शकत नाही अशा वंचित गटांमध्ये काँग्रेसचा जनाधार टिकून आहे. परंतु भ्रष्टाचारामुळे लागलेले गाल बोटामुळे या जनाधाराचे प्रतिनिधित्व करण्याची क्षमता राज्यातील आजच्या काँग्रेसमध्ये दिसून येत नाही.

## ४.२.२ भारतीय जनता पक्ष :-

महाराष्ट्राच्या इतिहासात भारतीय जनता पक्षाचे अस्तित्व जनसंघाच्या काळापासून आहे. १९८० मध्ये भाजपची स्थापना झाल्यानंतर या पक्षाला महाराष्ट्रात पूर्वीपेक्षा अधिक जनाधार मिळत गेलेला आपणास दिसून येतो. ''महाराष्ट्रात १९५२ च्या निवडणुकीपासून जनसंघाचे अस्तित्व दिसत असलं. तरी ते मर्यादितच होतं. १९५२ च्या निवडणुकीत विधानसभेकरिता या पक्षाने उण्यापुऱ्या २ जागा लढविल्या होत्या. मात्र १९६२ पासून जनता पक्षात विलीन होईपर्यंतच्या तीन निवडणुकीत जनसंघाने अनुक्रमे १२७, १६५ आणि १२२ एवढ्या जागा लढविल्या. मात्र या काळातही निवडून येणारे उमेदवार हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच होते. मात्र भाजपने शिवसेनेशी युती केल्यानंतर या चित्रात मोठा फरक पडला आणि महाराष्ट्राच्या राजकारणात या पक्षाने आपले स्थान निश्चित केले. १९९० पासून २००६ च्या नगरपालिका निवडणुकीपर्यंतचा सर्व काळ महाराष्ट्राच्या राजकारणात पक्षाचे स्थान चौथं राहिलेलं आहे. लोकसभा निवडणुकात पक्षाने तिसऱ्या स्थानापर्यंत मजल मारलेली आहे. विशेष म्हणजे राज्याच्या राजकारणात काहीही फेरबदल झाले, तरी आपला विधानसभेतील आकडा टिकवण्यातही पक्षाने यश मिळवलं आहे.''[७]

आज महाराष्ट्रात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व भाजप चार प्रमुख राजकीय शक्ती आहेत. १९९० मध्ये काँग्रेसला बहुमतापर्यंत पोहचवण्यासाठी फार कसरत करावी लागली. मात्र १९९५ मध्ये काँग्रेसचा आकडा ८० आमदारांपर्यंत खाली पोहचला. त्यानंतर काँग्रेसमध्ये विभाजन होऊन राष्ट्रवादी काँग्रेस हा स्वतंत्र पक्ष उभा राहिला. त्यानंतर वरील चारही पक्ष जवळपास समान ताकद बाळगून आहेत. त्यामुळे भाजपची १९८० ते २००६ ही भरारी अभ्यासण्यासारखी आहे असे आपणास दिसून येते. "१९८० मध्ये अटलबिहारी वाजपेयींच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत भाजपची स्थापन झाली. जनसंघाचा पुनर्जन्म झाला असल्याची चर्चा तेव्हा झाली होती. भाजपाचा १९८० ते १९९० हा दशकभराचा प्रवास या व्यासापलीकडे झालेला नाही. मात्र १९८६ नंतर रामजन्मभूमीचा वाद निर्माण झाला आणि भाजप चहूबाजूने फोफावू लागला. या प्रक्रियेला महाराष्ट्रामधूनही पाठबळ मिळालेले दिसते. देशात ज्या राज्यांमध्ये काँग्रेस बळकटपणे उभी होती, त्यातील एक प्रमुख राज्य महाराष्ट्र हे होतं. या राज्यात भाजपने मुसंडी मारली की, राज्याच्या राजकारणाचे आधार मोडून निघाले. भाजपने स्वत:चा हिंदुत्वाचा अजेंडा अशा जोरकसपणे मांडला की, हिंदुत्वाशी देणे-घेणे नसलेली शिवसेना पुरती भगवी होऊन गेली."[८] जनसंघापासून राज्यात असलेलं स्थान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची राज्यातली उपस्थिती, राज्यात सामाजिक अभियांत्रिकीचा राबलेला उपक्रम, काँग्रेसला बचावात्मक पवित्रा घ्यायला भाग पाडेल अशा मुद्यांची निवड, मध्यमवर्गासोबतच अन्य समाज घटकांना सामावून घेण्याचे प्रयत्न आणि बदलत्या अर्थ, राजकीय व्यवस्थेत मागच्या दशक-दीड शतकात स्वत:ला 'प्लेस' करण्याची योजना यामुळे आजपर्यंत भाजपची शिवसेनेशी युती असल्यामुळे या पावलांचा भाजपाला किती लाभ झाला हे गुलदस्त्यात असलं, तरी पक्ष टिकून राहण्यात आणि शिवसेनेपेक्षा वेगळा जनाधार उभा करण्यात पक्षाला यश मिळालेले आहे.

**महाराष्ट्रातील भाजपची राजकीय वाटचाल :-**

महाराष्ट्राच्या राजकारणात एकेकाळी नगण्य उपस्थिती असणारा पक्ष १९८५-८५ नंतर आपले अस्तित्व निर्माण करू लागला. पक्ष विस्तारासाठी भाजपाने दुहेरी रणनीती अवलंबल्यामुळे पक्षाला यश मिळाल्याचं निरीक्षण नोंदवल जाते. शहरी पांढरपेशा उच्चवर्णीयाचा पक्ष अस पूर्वी स्वरूप असलेल्या या पक्षाने पुणे-मुंबई-रत्नागिरी या शहरांप्रमाणेच उत्तर महाराष्ट्र-विदर्भ व मराठवाडा या विभागाकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यायला सुरूवात केली. विभागीय विस्ताराप्रमाणेच ग्रामीण विभागातील बहुजन समाजाला आकर्षित करण्याकडेही लक्ष दिलं गेल. ''रामभाऊ म्हाळगी, जगन्नाथराव जोशी, अरविंद लेले वगैरे नेत्यांची पिढी संपल्यानंतर प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, ना. स. फरांदे, अण्णा डांगे, सूर्यभान वहाडणे, शोभा फडणवीस वगैरे नाव पुढे आली. नंतरच्या काळात विदर्भातून नितीन गडकरी, महादेव शिवणकर, अरुण अडसड, विनोद गुडधे पाटील, भोला बढेल, सुधीर मुनगंटीवार वगैरे नावे पुढे आली. १९९० ते १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे एकूण ४२ उमेदवार निवडून आले, त्यातील कोकण आणि मुंबईत अनुक्रमे ५ व ९ विजयी उमेदवार होते तर उत्तर महाराष्ट्रात १६ पैकी ८, विदर्भात २८ पैकी १२ आणि मराठवाड्यात १४ पैकी ५ उमेदवार निवडून आले भाजपामधील बदलाची ती सुरूवात होती.''

१९९५ मध्ये भाजपाला आजपर्यंतचे सर्वाधिक यश मिळाले. कोकणात ९ पैकी ६, मुंबईत १३ पैकी १२, शिवाय उत्तर महाराष्ट्रात १७ पैकी १० व विदर्भात ४० पैकी २२ तसेच मराठवाड्यातसुद्धा १४ पैकी ९ इतका आकडा गाठता आला. कॉंग्रेसमधली वाढती बंडखोरी आणि अस्वस्थता, राजकारणातील भ्रष्टाचार व राजकारणाचे गुन्हेगारीकरण यावर केलेला आक्रमक प्रचार, बाबरी मशीद, राम मंदिर वादाच्या पार्श्वभूमीवर झालेला बॉम्बस्फोट व दंगली व नागपुरात गोवारींच्या मोर्चातील चेंगराचेंगरी अशा घटनांमुळे भाजपला यश मिळाले. महाराष्ट्राच्या राजकारणात जी

पोकळी निर्माण झाली होती ती भरून काढण्यातही भाजपला यश मिळाले. काँग्रेसच्या परंपरागत राजकारणामुळे ग्रामीण व निमशहरी भागांतील सत्तेपासून वंचित राहिलेले कुणबी-तेली-बंजारा-वंजारी-कोमटी-लेवा पाटील-माळी-धनगर असे समाज घटक व त्यातील उत्सुक नेते यांची राजकीय महत्त्वकांक्षा फक्त भाजपच पूर्ण करू शकतो असे त्यांना पटविण्यात भाजपाला आलेले यश. यामुळे भाजपाने यशाचा कळस गाठला. ‘‘या बाबीचे प्रतिबिंब १९९५ मध्ये सत्तेवर आल्यानंतर बनलेल्या मंत्रिमंडळाच्या सामाजिक स्वरूपावरूनही पडते. युतीच्या मंत्रिमंडळात भाजपाचे १५ मंत्री होते, त्यातील फक्त २ उच्चजातीय होते तर ४ मराठा, २ कुणबी, ३ ओ.बी.सी., प्रत्येकी १ दलित-आदिवासी व २ अमराठी मंत्री होते. विशेष म्हणजे १० कॅबिनेट मंत्र्यांपैकी ८ मंत्री उच्चजातीय होते. एकेकाळी फक्त सवर्ण-उच्च जातीयांचा म्हणून ओळखला जाणाऱ्या पक्षाने १९९० ते १९९५ मध्ये आपले पुरते रुप पालट करून टाकले होते. सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर ५ वर्षांनी म्हणजे २००४ च्या विधानसभा निवडणुकीत अपयशी होऊनही भाजपचं बदलेलं सामाजिक स्वरूप कायम टिकलेलं दिसत. ५४ आमदारांपैकी आधीप्रमाणेच उच्चजाती-५, मध्यम जाती-५, मराठा-कुणबी-१५, ओबीसी -१२, दलित-६, आदिवासी-४ व अमराठी-८ अशी विभागणी आहे.’’[९] या आकड्यांवरून एक बाब स्पष्ट दिसते की, बहुजन व दलित समाजातील काही नेत्यांना भाजपमार्फत सत्तेपर्यंत पोहचण्याचा विश्वास वाटत आहे.

‘‘भाजपाच्या मतांच्या टक्केवारीतही सातत्याने फेरपालट झालेले आहे. १९९० व १९९५ मध्ये भाजपला अनुक्रमे १०.७ व १२.८% मते मिळाली होती. तर १९९९ मध्ये पक्षाला २२.६ टक्के मते मिळाली होती. मात्र २००४ मध्ये पुन्हा पूर्वी इतकीच म्हणजे १३.७% मते मिळाली. भाजपच्या एकूण यशापशाकडे पाहता असं दिसतं की, विधानसभेत मिळालेल्या जागापेक्षा मतांच्या टक्केवारीतील फेरफारामध्ये मोठा चढ उतार आहे.’’[१०] महाराष्ट्रात अव्वल क्रमांक मिळविण्यात अपयशी होण्यात प्राय:

भाजप स्वत:च जबाबदार असला, तरी भाजपच्या विस्तार होण्यात या पक्षाने निवडलेला मित्रपक्ष शिवसेना हा जबाबदार आहे, ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही. भाजप हा राष्ट्रीय पक्ष असला आणि शिवसेना हा प्रादेशिक पक्ष असला, तरी महाराष्ट्रात शिवसेना थोरला नि भाजप धाकटा अस समीकरण पहिल्यापासून राहिलेले आहे.

### ४.२.३ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष :-

गेल्या अनेक वर्षांपासून मराठा वर्चस्वाच्या राजकारणानंतर १९७० च्या दशकापासून काँग्रेसच्या संघटनांतर्गत विसंगती डोके वर काढू लागल्या. त्यातून मुख्यत: यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाचे जे ''प्रारूप'' होते त्यानुसार राजकारण करणाऱ्या गटांना काँग्रेसमधून बाहेर पडणे भाग पडले. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रात हेच या सगळ्या घडामोडीचे केंद्र होते. मराठा समाजाची ऐतिहासिक वाटचाल, सत्ताकांक्षा, धुरिणत्व आणि त्याला मिळालेली आव्हाने यांची पार्श्वभूमी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उदयाला व वाटचालीला लाभली आहे. याशिवाय महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, सहकारी चळवळ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राजकारण याचाही जवळचा संबंध आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय राजकारणातल्या घडामोडींचा परिणाम म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसची निर्मिती झाली. अखिल भारतीय पक्ष बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा हा पक्ष प्रत्यक्ष व्यवहारात मात्र महाराष्ट्रातला एक महत्त्वाचा प्रादेशिक पक्ष बनलेला दिसतो.

''शरद पवारांनी १९७८ मध्ये 'समाजवादी काँग्रेस' हा पक्ष स्थापन केला. महाराष्ट्रात काँग्रेस अंतर्गत गटबाजी आधीही होती, परंतु ती पक्षीय पातळीवरच नियंत्रित केली जात असे. शरद पवारांनी समाजवादी काँग्रेस स्थापन केली तेव्हा मात्र पक्षांतर्गत गटबाजीला वेगळा संदर्भ लागला. ग्रामीण भागात सधनता वाढल्यामुळे गटबाजी वाढली होती. पक्ष व विचार महत्त्वाचा नाही, अशी भावना निर्माण झाली होती. जिकडे नेते, तिकडे मतदार असे घडू लागले होते. कारण स्थानिक, आर्थिक हितसंबंध महत्त्वाचे बनू पाहत होते. त्यामुळे शरद पवाराच्या पाठीशी संपूर्ण एक गट उभा राहू शकला व

समाजवादी काँग्रेस स्थापन होऊ शकली. दक्षिण महाराष्ट्रातील मराठा नेतृत्वाकडे राज्याची सत्ता राहावी, म्हणूनही समाजवादी काँग्रेसची स्थापना झाल्याचे निरीक्षण नोंदवले जाते.''[११] पुलोद सरकारच्या काळात शरद पवारांनी अनेक पुरोगामी निर्णय घेतले. मात्र मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासारख्या निर्णयाने मराठा मतदार समाजवादी काँग्रेसवर नाराज झाला. १९८० मध्ये शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेसला दक्षिण महाराष्ट्रात फारसा पाठिंबा मिळाला नाही. परंतु मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रात पवारांनी आपला मतदारसंघ तयार केला आणि समाजवादी काँग्रेसने आपली पुरोगामी प्रतिमा कायम ठेवण्यातही यश मिळविले.

''१९९५ सालची विधानसभा निवडणूक महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली. या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला. १९७७ ते १९९५ पर्यंतच्या काँग्रेस अंतर्गत पेचप्रसंगाची परिणती १९९५ च्या निकालात घडून आली. शिवसेना-भाजप युतीच्या १३८ जागा आणि २९% मते मिळवून अपक्ष आणि काँग्रेस बंडखोरांच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. महाराष्ट्रातील हे पहिले पूर्णपणे 'बिगर काँग्रेसी' सरकार स्थापन झाले.''[१२] काँग्रेसमधील गटातटांचे राजकारण, प्रस्थापित घराणेशाहीविरुद्ध नाराजी, मुंबई दंगलीच्या काळातील युतीचे आक्रमक राजकारण, विदर्भ-मराठवाडा-कोकणातील जनतेमध्ये राजकर्त्यांनी आपल्याकडे सतत दुर्लक्ष केल्याची भावना आणि मुख्य म्हणजे आतापर्यंत काँग्रेसच्या पाठीमागे असणाऱ्या मराठा-कुणबी आणि इतर मागासवर्गीय जातीगटांत झालेल्या मत विभागणीचा फायदा युतीला झाला. या सर्व कारणांचा एकत्रित परिणाम म्हणजे महाराष्ट्रातील सत्तांतर होय. ''दरम्यान काँग्रेसमध्ये अंतर्गत संकट वाढतच गेले. सोनिया गांधींच्या विदेशीपणाचा मुद्दा पुढे करीत शरद पवारांनी काँग्रेस विरोधात १३ वर्षांनी दुसरे बंड केले. सोनिया गांधी यांची संसदीय पक्षाच्या नेतेपदी निवड विरोधी पक्ष नेते असलेल्या पवारांना अस्वस्थ करणारी ठरली. नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा असलेल्या पवारांनी सोनिया गांधीविरुद्ध बंड करून १० जून

१९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. नव्याने स्थापन झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमुळे राजकारणातील गुंतागुंत वाढली. १९९९ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, सेना-भाजप युती आणि तिसऱ्या आघाडीतील पक्ष याच्यातील बहुपक्षीय सत्ता स्पर्धेत त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आली. काँग्रेसने ७५, राष्ट्रवादी ५८, शिवसेना ६९ तर भाजपने ५६ जागा जिंकल्या राष्ट्रवादी पक्ष प्रामुख्याने मराठ्यांचा आणि पश्चिम महाराष्ट्रातील पक्ष म्हणून पुढे आला.''[१३] राजकीय अपरिहार्यतेतून स्वतंत्रपणे निवडणुका लढवणाऱ्या दोन्ही काँग्रेस पक्षांनी आघाडी करून सत्ता स्थापन केली.

लोकशाही सरकारची पाच वर्षांतील कामगिरी फारशी समाधानकारक नव्हती. सरकारवरील नाराजीचे पडसाद एप्रिल २००४ मधील लोकसभा निवडणुकीत उमटले होतेच. दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, तेलगी. घोटाळा इत्यादी मुद्यांमुळे राज्य सरकार पेचात पडले. शेतकऱ्यांची कर्जमाफी, वीज बिल माफीचे आश्वासन आणि केंद्रात व राज्यात एकाच पक्षाचे सरकार असणे सोयीचे आहे, या मुद्यांवर भर देणारी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी दुसऱ्यांदा २००४ मध्ये सत्तेवर आली. यावेळी काँग्रेसने व राष्ट्रवादी आघाडीने १४० सेना भाजप युतीने ११६ जागा जिंकल्या याच दरम्यान उद्धव ठाकरेंचे शिवसेनेतील महत्त्व जसे वाढत गेले तसा पक्षातील असंतोष वाढत गेला. बाळासाहेब ठाकरेंच्या वाढत्या वयोमानानुसार संघटनेवरील वचक कमी झाला. उद्धव ठाकरेंच्या कार्यपद्धतीतून नाराज नारायण राणे काँग्रेसमध्ये आले तर उद्धव-राज यांच्यातील नेतृत्व संघर्षातून राज ठाकरेंनी मार्च २००६ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केली. मनसेने शिवसेनेच्या मराठी मतांमध्ये केलेली विभागणी काँग्रेस राष्ट्रवादीच्या पथ्यावर पडली. सुमार कामगिरी असलेले आघाडीचे सरकार २००९ मध्ये राज्यात तिसऱ्यांदा सत्तेवर आले. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेससोबत सत्ताधारी पक्ष म्हणून वाटचाल करीत आहे.

## ४.३ प्रमुख प्रादेशिक पक्ष :-

### ४.३.१ शिवसेना :-

प्रादेशिक अस्मितेची लाट ज्या काळात संपूर्ण भारतात पसरली होती. त्या काळातच शिवसेनेचा जन्म झाला. विविध संघटनेप्रमाणे म्हणजेच तेलगू देसमु, द्रमुक, कन्नड सेना या प्रादेशिक पक्षांप्रमाणेच महाराष्ट्रात शिवसेनेने प्रादेशिक भावनेच्या बळावर राजकारण केले आणि त्यात वर्चस्व स्थापन केले. मराठी माणसाचे कवच कुंडल असल्याचा दावा करत शिवसेनेची स्थापना झाली. मराठी माणसाच्या अस्तित्वाचे व अस्मितेचे संरक्षण करण्यासाठी १९ जून १९८६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना या अराजकीय संघटनेची स्थापना मुंबई येथे केली. सुरुवातीला शिवसेना एक सामाजिक व्यासपीठ होते आणि राजकारणाशी या संघटनेचा काही संबंध नव्हता. प्रारंभी अराजकीय भूमिका स्वीकारून समाजकारणाचा दावा करणाऱ्या शिवसेनेचे मन अल्पावधीतच मोडले आणि १९६८ च्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका लढवून ४२ जागा शिवसेनेने मिळवून आपला महापौर करण्यात यश मिळविले. शिवसेनेने प्रारंभी स्वीकारलेल्या अराजकीय भूमिकेचे विश्लेषण करताना ज्येष्ठ राजकीय विश्लेषक सुहास पळशीकर म्हणतात की, ''मुंबईत शिवसेनेच्या पहिल्या मेळाव्यास काँग्रेस नेते रामराव आदिक उपस्थित होते. त्यामुळे काँग्रेसमधील एका गटाची खुशामत करणे गरजेचे असल्यामुळे राजकीय भूमिका घेणे शिवसेनेस शक्य नव्हते. याशिवाय अराजकीय भूमिका शहरी मध्यमवर्गाला विशेष रुचणारी आहे हे लक्षात घेणे जरुरीचे होते. त्याचबरोबर फॅसिस्ट म्हणजे हुकूमशाही राजकारणाची सुरूवात अराजकीय भूमिकेपासूनच केली जाते हेही लक्षात घेणे आवश्यक आहे.''[१४] सदरील मताचा विचार केल्यास शिवसेनेच्या अराजकीय भूमिका स्वीकारण्याची कारण मीमांसा स्पष्ट होते.

महाराष्ट्राच्या पक्ष पद्धतीमध्ये १९८९ ते १९९९ या काळात जे स्थित्यंतर घडून आले त्याला 'राज्य' पातळीवरच्या दोन पक्षांचा हातभार लागला. शिवसेना आणि

राष्ट्रवादी काँग्रेस हे ते दोन पक्ष होत. त्यातही या स्थित्यंतराची सुरूवात झाली ती शिवसेनेच्या विस्तारापासून. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाच्या व्यापक सामाजिक आधारांना खिंडार पाडण्यासाठी कोणताही विरोधी पक्ष पुरा पडत नाही, हा १९७७ पासूनच अनुभव पाठीशी असल्यामुळे शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांनी महाराष्ट्रात आघाडी करण्याचा निर्णय घेतला आणि पक्ष पद्धतीमधील बदलांना चालना मिळाली. ''१९६७ ते १९७२ या काळात मुंबई आणि ठाणे या दोन्ही शहरांमध्ये स्थानिक निवडणुकीतला एक महत्त्वाचा पक्ष म्हणून शिवसेना वावरत होती. त्यामुळे मुंबई-ठाण्यातील मराठी माणसाचा पक्ष अशी शिवसेनेने कट्टर कम्युनिस्ट विरोधाची भूमिका घेतली होती. मुंबईतील डाव्या कामगार संघटनेचा प्रभाव कमी करण्यात शिवसेना या कालखंडात व्यग्र होती. महाराष्ट्राच्या विधानसभेत शिवसेनेचा पहिला आमदार निवडून गेला तो याच पार्श्वभूमीवर. सत्तरीच्या दशकात शिवसेना निवडणुकांच्या राजकारणात अधिक नियमितपणे अवतरली. १९७१ च्या निवडणुकीत इंदिरा गांधीच्या काँग्रेसच्या विरोधात असणाऱ्या संघटना काँग्रेसशी शिवसेनेचा समझोता झाला होता. १९७२ च्या विधानसभेसाठी शिवसेनेने २६ जागा लढवल्या व फक्त मुंबईत एक ठिकाणी यश मिळविले आणिबाणीच्या कालखंडात शिवसेनेने आणीबाणीला पाठिंबा दिला. मात्र १९७७ च्या निवडणुकांत शिवसेना उतरली नाही. जनता पक्षाच्या यशाच्या पार्श्वभूमीवर १९७८ मध्ये शिवसेनेने जनता पक्षाशी समझोता करण्याचा प्रयत्न केला परंतु जनता पक्षाकडून प्रतिसाद न मिळाल्याने सेनेने काँग्रेसशी समझोता करून ३ जागा लढवल्या, पण सर्व ठिकाणी शिवसेनेचा पराभव झाला. १९८५ मध्ये पुरोगामी लोकशाही दलाने (पुलोद) शरद पवारांच्या नेतृत्वाखाली लढवलेल्या निवडणुकीत शिवसेनेला स्थान मिळाले नाही. शिवसेनेने स्वतंत्रपणे ३३ जागा लढवल्या आणि मुंबईतील एक जागा जिंकली. ''या पार्श्वभूमीवर १९८९ मध्ये भाजप आणि शिवसेना यांची युती झाली. १९९० च्या विधानसभा निवडणुकीतही ती कायम राहिली. तेव्हापासून २००८

पर्यंतच्या सर्व विधानसभा व लोकसभा निवडणुका या दोन पक्षांनी एकत्रितपणे लढवल्या. भारतीय राजकारणातील 'आघाड्यांचे युग' सुरू होण्यापूर्वी अस्तित्वात आलेली ही आघाडी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. पश्चिम बंगालमधील डावी आघाडी वगळता एवढा दीर्घकाळ एखादी आघाडी कायम राहिल्याचे शिवसेना-भाजप युती हे एकमेव उदाहरण आहे.''[१६] या आघाडीचा फायदा १९८९ नंतरच्या सर्वच निवडणुकांमध्ये झालेला दिसतो.

एक प्रादेशिक पक्ष म्हणून शिवसेनेची सुरूवात १९८९ च्या निवडणुकीपासूनच अधिकृतपणे झाली. १९८९ व १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाने ४ जागा जिंकल्या. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला ५२ जागा मिळाल्या. या निवडणुकीपासूनच भारतीय जनता पक्षाशी युती शिवसेनेने केली आणि राष्ट्रीय राजकारणाशी आपली नाळ जोडली. १९९५ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने ७३ जागा मिळवून भाजपाच्या मदतीने प्रथमच सरकार स्थापन केले. प्रथम मनोहर जोशी व नारायण राणे यांना आलटून पालटून मुख्यमंत्रिपदे बहाल केली. तसेच शिवसेनेने महाराष्ट्रातून लोकसभा निवडणुकीत १९९६ ला १५ जागा, १९९८ मध्ये ६ जागा, १९९९ मध्ये १५ जागा व २००९ मध्ये ११ जागा प्राप्त केल्या. केंद्रात भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील एन.डी.ए. सरकारमध्ये शिवसेना सहभागी होती. संमिश्र सरकारांच्या या काळात शिवसेनेसारख्या प्रादेशिक पक्षाला राष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त झाले होते हे महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या तरी पीछेहाट करत असलेला हा प्रादेशिक पक्ष अंतर्गत बंडाळीमुळे विशेषत्वाने गांजला आहे. बाळ ठाकरेंचा ओसरत चाललेला नेतृत्व महिमा आणि पक्षाचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीवर संशय घेत नारायण राणेंचा काँग्रेसशी झालेला घरोबा पक्षाच्या अवकळेला कारणीभूत ठरला आहे. याशिवाय राज ठाकरे यांनी पुकारलेली यादवी आणि त्यातून उदयाला आलेला महाराष्ट्र नवनिर्माण

सेना हा पक्ष शिवसेनेला शक्तिहीन करण्यास कारण बनला आहे. ज्यावेगाने शिवसेनेच्या राजकारणातील आलेख उंचावला तितक्याच वेगाने तो खाली येत आहे हे वास्तव नाकारता येणार नाही.

## ४.३.२ महाराष्ट्र नवनिर्माण सेना :-

बाळ ठाकरे यांनी स्वत:च्या कष्टावर शिवसेनेची स्थापना करून या पक्षाला विकासाची परमोच्च अवस्था प्राप्त करून दिली. बाळ ठाकरेंच्या व्यक्ती वलयांकित शिवसेना पक्षाचे वारसदार म्हणून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्याकडे पहिल्यापासून पाहिले जात होते. त्यामुळे तरुण पिढीकडे त्यांचे आकर्षण होते. राज ठाकरेंचा प्रभाव वाढत असतानाच शिवसेना प्रमुख बाळ ठाकरेंचे वय वाढत असल्याने त्यांच्यानंतर शिवसेना पक्षाला नवीन वारसदार कोण मिळणार हा प्रश्न उपस्थित झाला होता. यामुळे शिवसेना प्रमखांनी मन मोठे करून शिवसेनेचा वारसदार ठाकरे असावा हे निश्चित केले. ‘‘राज ठाकरे यांनीसुद्धा उद्धव ठाकरे यांना कार्यध्यक्ष करावे यासाठी दुजोरा दिला. परंतु वारसा हक्काने पुत्र म्हणून आपल्याला कार्याध्यक्षपद लाभले या भावनेने उद्धव ठाकरे शिवसेनेची सर्वच सूत्रे हातात घेऊ लागले आणि आपल्या मनाप्रमाणे कारभार करू लागले. त्यांची ही कार्य करण्याची पद्धत न रुचणारी होती. त्यांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढत प्रथम नारायण राणे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. नारायण राणे यांच्या या निर्णयाने शिवसेना बिथरली व प्रामुख्याने उद्धव ठाकरे अधिकच स्वकेंद्री होऊन वागू लागले. पक्ष निर्णय, नेमणुका, निवड आणि पक्षाच्या पातळीवर सर्वच काही आपल्या मतानुसार करू लागले. या संदर्भात राज ठाकरेंनी शिवसेना प्रमुख बाळ ठाकरेंकडे तक्रारही केली. पण पुत्र प्रेमाने भारावून जाऊन पुतण्याच्या बोलण्याकडे त्यांनी कानाडोळा केला. या सर्व प्रकारांमुळे आपल्यावर अन्याय होत आहे अशी भावना राज ठाकरेंच्या मनात निर्माण झाली आणि त्यांनी शिवसेना सोडण्याचा विचार केला.’’[१७]

शिवसेनेत आपली गळचेपी होत आहे हे शल्य बोचत असल्याचे राज ठाकरेंनी शिवसेनेतून २००६ मध्ये बाहेर पडत आपल्या नव्या पक्षाची स्थापना करण्याची घोषणा केली. शिवसनेच्या काळात भारतीय विद्यार्थी सेनेत स्वत:ची वेगळी प्रतिमा निर्माण केल्याने फार मोठा युवा वर्ग राज ठाकरे यांच्यासोबत होता. या सर्व नवयुवा कार्यकर्त्यांनी सुद्धा शिवसेनेला सोडचिठ्ठी दिली. त्यामुळे शिवसेना सोडल्यापासूनच लोकप्रियता वाढतच गेली. या सर्व परिस्थितीचा लाभ घेत राज ठाकरेंनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी बैठका व सभा घेऊन पक्ष स्थापनेच्या सर्व शक्यता पडताळून पाहिल्या व ९ मार्च २००६ रोजी 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' या राजकीय पक्षाची स्थापना केली.

**मनसेची राजकीय वाटचाल :-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केल्यानंतर या पक्ष संघटनेने आक्रमक व नाट्यपूर्ण राजकारण करण्यास सुरूवात केली. पुढील येणाऱ्या ''२००९ मधील विधानसभा निवडणुकीचे लक्ष्य समोर ठेवून मराठी अस्मितेचे राजकारण करण्यास मनसेने सुरूवात केली. उत्तर भारतीयांच्या मुंबईत येणाऱ्या लोंढ्यांना विरोध करणे, छटपूजेला विरोध, रेल्वे नोकऱ्यात मराठी तरुणांना प्राधान्य, दुकानांना मराठी पाट्या लावण्याचे आंदोलन करून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मराठी माणसांचे मन व मत जिंकण्याचा प्रयत्न केला. 'महाराष्ट्र विरुद्ध बिहार' असा सामना रंगवून आपले पाय महाराष्ट्राच्या राजकारणात अल्पावधीतच रोवण्यात मनसेला यश मिळाले.''[१८]

मनसेने फार कमी काळात महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटविला. २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत १४३ जागा लढवून १३ जागांवर विजय मिळविला. पक्षाच्या या यशामुळे निवडणूक आयोगाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेस प्रादेशिक पक्षाचा दर्जा बहाल केला आणि निवडणूक चिन्ह म्हणून 'रेल्वे इंजिन' दिले. यामुळे शिवसेनेचे फार मोठे नुकसान झाले. मुंबई हा शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जायचा पण मनसेमुळे या संकल्पनेलाही सुरुंग लागला. मराठी मतांची विभागणी

करण्यात मनसेने यश मिळविले. याशिवाय निवडणुकीनंतर आमदारांच्या शपथविधित सर्वांनी मराठी भाषेतून शपथ घ्यावी असे फर्मान काढले. या फर्मानाला विरोध करणाऱ्या एका नेत्याला मारहाण केली. या आमदारांचे निलंबन केले गेले व नंतर ते रद्दही करण्यात आले पण या घटनेच्या प्रसिद्धीचा पुरेपूर फायदा मनसेने घेऊन आपली राजकीय वाटचाल यशस्वी करून दाखविली.

**मनसेचा जाहीरनामा :-**

१. मराठी अस्तिमा जोपासण्यासाठी प्रयत्न करणे.

२. महाराष्ट्रातील दुकानांच्या पाट्या मराठीतून लावण्यासाठी मोहीम उघडणे.

३. महाराष्ट्रात राहणाऱ्यांना मराठी यायलाच हवे.

४. महाराष्ट्रातले सर्व व्यवहार मराठी भाषेतूनच चालले पाहिजेत.

५. परप्रांतियांनी महाराष्ट्रीयन संस्कृतीशी एकरूप व्हावे आणि त्यांनी त्यांच्या राज्यातील कार्यक्रम महाराष्ट्रात शक्ति प्रदर्शनाच्या स्वरूपात साजरे करू नयेत यासाठी भूमिका घेणे.

६. मराठी तरुणांना महाराष्ट्रातील नोकरी, उद्योग यात प्राधान्य देण्यात यावे, स्थानिकांचीच भरती करावी.

७. हिंदी व इंग्रजी भाषेला विरोध करणे.

८. अन्य राज्यातून येणारे मुंबईतील लोंढे थोपविणे.

९. मराठी रक्षणाच्या मुद्यावर मराठी नेत्यांचे एकत्रीकरण करणे.

१०. महाराष्ट्राच्या नवनिर्माणाची व्यापक ब्ल्यू प्रिंट तयार करणे.''[१९]

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची वाटचाल ही मराठी अस्मिता जपणारी वाटचाल आहे असे पक्ष जाहीरनामा व ध्येय-धोरणात आपणास दिसून येते. अल्पावधीत महाराष्ट्राच्या राजकारणात आपले पाय रोवणारा हा पक्ष भविष्यात कोणत्या राजकीय खेळीला व

सत्तेपर्यंत पोहचण्यासाठी महाराष्ट्रातील मराठी माणसांची यासाठी किती सहकार्य लागेल हे वाखाणण्याजोगे आहे.

### ४.३.३ भारतीय रिपब्लिकन पक्ष :-

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करताना रिपब्लिकन पक्षाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरावे, इतके महत्त्व या पक्षास महाराष्ट्राच्या राजकारणात आहे. राजकीय पक्ष हा एका निश्चित विचारसरणीने संघटित झालेल्या लोकांचा समूह असतो. भारतात व महाराष्ट्रात भिन्न प्रवाहाचे प्रतिपादन करणारे राजकीय पक्ष आहेत. त्यातील भारतीय रिपब्लिकन पक्ष हा दलित अस्मितेचा पुरस्कार करणारा आंबेडकरवादी विचार प्रवाहाचा पक्ष आहे. ''रिपब्लिकन पक्षास एवढे महत्त्व प्राप्त होण्याचे कारण तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या हिंदू समाजातील जातींच्या मानवी हक्क प्राप्त व आत्म सन्मान चळवळीचा वारसदार म्हणून राजकीय क्षेत्रात कार्यरत आहे. हिंदू समाजव्यवस्थेतील अस्पृश्यांचे स्थान व त्यामुळे त्यांच्यावर लादण्यात आलेली गुलामी नाहीशी करण्यासाठी अस्पृश्यांना प्रौढ मतदानावर आधारलेली राज्यव्यवस्था निर्माण करण्याची भूमिका घेतली पाहिजे. हे अस्पृश्यांच्या राजकारणाचे मध्यवर्ती सूत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढे मांडले.''[२०]

रिपब्लिकन पक्षाची स्थापना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी झाली असली तरीही या पक्षाच्या निर्मितीची पाळेमुळे स्वातंत्र्यपूर्वी भारतात शोधावी लागतात. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून अस्पृश्य जातीच्या लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर जेव्हा १९३५ च्या कायद्यानुसार भारतात निवडणुका घेण्याचे ठरविण्यात आले तेव्हा १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. १९३७ मध्ये झालेल्या निवडणुका स्वतंत्र मजूर पक्षाने लढविल्या. तत्कालीन मुंबई प्रांतात पक्षास १३ जागा मिळाल्या. देशातील मागास,

अस्पृश्य जाती-जमातीच्या व्यापक हिताच्या दृष्टीने १९४२ मध्ये स्वतंत्र मजूर पक्ष बरखास्त करून बाबासाहेबांनी १९ जुलै १९४२ रोजी 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची' स्थापना केली. १९४६ च्या प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुका फेडरेशनने लढविल्या पण त्यात पराभव पत्करावा लागला. त्यानंतर विविध भागांत विविध प्रागतिक पक्षांशी समझोता करून पक्षाने निवडणुका लढविल्या. त्यात अल्प यश मिळू शकले. १९५२ च्या निवडणुकीत हा पक्ष पिछाडीवर राहिला. त्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राजकारणाऐवजी समाजकारणाला प्राधान्य द्यावे असा प्रस्ताव मांडला. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष अनुसूचित जातीं पुरताच मर्यादित न ठेवता त्याचे व्यापक स्वरूप बनावे. परंतु दुर्दैवाने या प्रस्तावावर कार्य करण्यापूर्वीच बाबासाहेबांचे निधन झाले.''[२१] तसेच शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे नाव बदलून रिपब्लिकन पार्टी करावे अशी इच्छादेखील बाबासाहेबांनी व्यक्त केली होती. म्हणूनच त्यांच्या निधनानंतर त्यांच्या अनुयायांनी ऑल इंडिया रिपब्लिकन पक्षाची स्थापन करून पक्ष कार्याला सुरूवात केली.

**रिपब्लिकन पक्षातील फाटाफूट व गटबाजी :-**

पक्ष स्थापनेस एक वर्ष पूर्ण होताच १९५८ मध्ये पक्षात फूट पडली. सर्वसाधारण सभेत ठरल्याप्रमाणे पक्षाची घटना लिहिली नाही व निवडणूक घेऊन नवी कार्यकारणी निवडली नाही या तांत्रिक कारणावरून फूट पडल्याचे सांगितले गेले, परंतु प्रत्यक्षात नेतृत्वाचा अहंकार हेच फुटीचे खरे कारण होते. दादासाहेब गायकवाडांचा कम्युनिस्टांकडे कल आहे असेही एक कारण सांगितले जाते. पक्षाच्या पहिल्या फुटीतून एन. शिवराज, बॅ. खोब्रागडे, दादासाहेब गायकवाड, दत्ता कुटी, आर.डी. भंडारे यांचा एक गट तर ॲड. बी.सी. कांबळे, ॲड. एच.डी. आवळे (बाबू), ॲड. दा. ता. रुपवते यांचा दुसरा गट असे दोन गट अस्तित्वात आले. यानंतरचा रिपब्लिकन पक्षाचा इतिहास हा विभाजनाचा व ऐक्य प्रक्रियेचा इतिहास आहे. त्यानंतर गायकवाड गट, खोब्रागडे गट, गवई गट, प्रकाश आंबेडकर गट, आठवले गट, ढाले गट, ढसाळ गट असे असंख्य

गट निर्माण झाले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न धुळीला मिळाले. यातील काही गट तर काँग्रेसी आश्रयातच धन्यता मानतात. तर काही गट त्यांच्या फक्त नावापुरतेच शिल्लक आहेत.

''महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्य प्रकाशित करण्याचा उपक्रम हाती घेतला होता. या उपक्रमातील डॉ. आंबेडकरांच्या साहित्याचा चौथा खंड शासनाने १९८७ मध्ये प्रकाशित केला. 'हिंदू धर्मातील कूटप्रश्न' या विषयावरील डॉ. आंबेडकरांच्या मतावर आक्षेप नोंदवत मराठा महासंघ, शिवसेना इ. हिंदुत्ववादी संघटनांनी या पुस्तकातील आक्षेपार्ह भाग वगळण्याची मागणी केली व आंदोलन केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून सर्व दलित संघटनांनी एकत्रित येऊन विचार-स्वातंत्र्य व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी ऐतिहासिक लढा दिला. या लढ्यामुळे आंबेडकरी अनुयायांमध्ये पुन्हा ऐक्याची भावना निर्माण झाली व त्याच्या प्रभावातून ५ डिसेंबर १९८९ रोजी रिपब्लिकन ऐक्य घडले.''[२२] गवई, खोब्रागडे, कांबळे, आंबेडकर इ. गट व दलित पँथर संघटनेचे प्रतिनिधित्व रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे, अशोक गोडघाटे इ. नेत्यांनी केले. परंतु १९९० च्या निवडणुकीत काँग्रेस व जनता दल यापैकी कोणाशी युती करावी या मुद्यावर पक्षात फूट पडली.

१९९८ च्या लोकसभा निवडणुकीत सर्वच रिपब्लिकन गटांनी काँग्रेसशी युती केल्याने पक्षाचे तांत्रिक स्वरूपाचे ऐक्य घडले. परंतु १९९८-९९ मध्ये महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षात फूट पडून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन झाल्याने १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत कोणत्या काँग्रेससोबत युती करायची या वादात आठवले-गवई-कवाडे गटात फूट पडली. कवाडे व गवई यांनी काँग्रेससोबत तर आठवले यांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करण्याचा निर्णय घेतला.

''२००२ सालच्या निवडणुकीत तर रिपब्लिकन पक्षाचे रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, रा.सू. गवई, टी.एम. कांबळे, खोब्रागडे, बी.सी. कांबळे यांचे प्रमुख

गट अस्तित्वात होते. याशिवाय अनेक छोटे-छोटे गट रिपब्लिकन पक्षाच्या नावाने कार्यरत आहेत. त्यांची निवडणुकीच्या राजकारणातील ताकदही तशी नगण्यच होती. परंतु रिपब्लिकन शब्दाचा समावेश असलेले अनेक पक्ष सतत उभे राहतात व फुटतात हा गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास आहे. मागील पन्नास वर्षांत रिपब्लिकन पक्षांच्या फुटीच्या इतिहासाला आणखी एक पैलूही आहे. रिपब्लिकन राजकारणात सोडून काँग्रेस अथवा अन्य प्रभावी पक्षात सामील होण्याची प्रक्रियाही पाहायला मिळते. आर. डी. भंडारे, ॲड. दा. ना. रूपवते, चंद्रकांत हंडोरे इ. नेत्यांची नावे या संदर्भात सांगता येतील''[२३] रिपब्लिकन राजकारणाची ताकद कमी करण्याचे काम जसे सततच्या फुटीमुळे झाले आहे तसेच अशा प्रकारच्या पक्षांतरांनी केले आहे हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

### ४.३.४ शेतकरी-कामगार पक्ष :-

शेतकरी कामगार पक्षाला सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीची पार्श्वभूमी आहे. आज महाराष्ट्राच्या राजकारणातील एक प्रमुख प्रादेशिक पक्ष म्हणून शेतकरी-कामगार पक्षाचा उल्लेख करावा लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी शेतकरी-कामगार पक्षाची स्थापना झाल्यामुळे तत्कालीन घटनांचा वेध घेणे या पक्षाला जाणून घेण्यासाठी आवश्यक ठरते. ''१३ जून १९४९ रोजी केशवराव जेधे यांच्या प्रेरणेतून भाऊसाहेब राऊत यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी-कामगार पक्षाची स्थापना करण्यात आली. शेतकरी-कामगार पक्ष स्वत:ला भारतीय व डाव्या विचारसरणीचा पक्ष म्हणवतो. म्हणून पक्षाचे अधिकृत नाव अखिल भारतीय शेतकरी-कामगार पक्ष आहे. पण वास्तविकदृष्ट्या हा पक्ष महाराष्ट्रापुरताच मर्यादित आहे. ३ ऑगस्ट १९४७ हा शेतकरी-कामगार पक्षाचा स्थापना दिन मानला जातो.''

शेतकरी कामगार पक्षाने १९५० मध्ये दाभाडी येथील अधिवेशनात मार्क्सवादी विचार स्विकार करून सत्तावादी समाजाच्या निर्मितीचे उद्दिष्ट समोर ठेवले. मार्क्स व लेनिनच्या साम्यवादी तत्वानुसार श्रद्धा ठेवणारा आणि समाजातील नाही घटकांचे

प्रतिनिधित्व करणारा व त्यांच्यासाठी संघर्ष करणारा हा पक्ष आहे. शेकापने आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीचे वैचारिक नेतृत्व स्वीकारल्याचा दावा केला जातो. शेकापची वैचारिकता स्पष्ट करताना प्राचार्य कोगेकर म्हणतात की, ''शेकाप जरी वर्ग संघर्षाची परिभाषा बोलत असला तरीही वास्तविकरीत्या आहे रे आणि नाही रे वर्गातील संघर्ष शेटजी-भटजीविरूद्ध बहुजन समाज असे शोषक व शोषित जातीय संघर्षाचे मार्क्सवादी स्पष्टीकरण या पक्षाने दिले.''[२४] यावरून शेतकरी-कामगार पक्षाच्या वैचारिकतेच्या बैठकीची कल्पना येते.

शेतकरी-कामगार पक्ष हा सुरवातीपासून काँग्रेसच्या एकांगी व भांडवलशाही पुरस्कृत धोरणाला विरोध करत शेकापची स्थापना झाली ती काँग्रेसला पर्याय देण्याच्या विचारातून. बहुजन समाजातील फार मोठ्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची फळी या पक्षाला प्रारंभी लाभली होती. केशराव जेधे, शंकरराव मोरे, दाजीबा देसाई, भाऊसाहेब राऊत, दत्ता देशमुख, कृष्णराव धुळप, उद्धवराव पाटील, एन.डी. पाटील, दत्ता पाटील, गणपतराव देशमुख, केशवराव धोंडगे, दि. बा. पाटील यासारख्या दिग्गज नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली या पक्षाने आपली वाटचाल केली आहे. १९५२ च्या तत्कालीन मुंबई प्रांत विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाला १४ जागा तर १९५७ च्या निवडणुकीत पक्षाने २८ जागा मिळविल्या. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या लढ्यात हा पक्ष अग्रभागी होता. त्यामुळे अल्पावधीत शेतकरी-कामगार पक्षाला कमालाची उभारी आली. शेतकरी कामगार पक्षाने महत्त्वाच्या रिंगणात आपले संमिश्र दर्शन आजपर्यंत घडविले आहे. ''महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाचे संख्याबळ पाहता १९७२ मध्ये ८ जागा, १९६७ मध्ये १९ जागा, १९८५ मध्ये १३ जागा, १९९० मध्ये ८ जागा, १९९५ मध्ये ६ जागा, १९९९ मध्ये ५ जागा, २००४ च्या निवडणुकीत २ जागा आणि २००९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शेतकरी-कामगार पक्ष हा रिपब्लिकन डावी लोकशाही समितीत (रिडालोस) एक घटक पक्ष होता. या निवडणुकीत

शेकापला ४ जागा मिळाल्या.''[२५] एकूणच शेतकरी कामगार पक्षाच्या राजकीय वाटचालीवर दृष्टिक्षेप टाकल्यास सत्ताकारणाच्या खेळात शेकाप पिछाडीवर असल्याचे जाणवते. यावरून शेकापचे आपल्या वैचारिक भूमिकेशी तडजोड न केल्यामुळे आणि नैतिक, तात्त्विक राजकारणाला प्राधान्य दिल्याने सत्ताकारणाची समीकरणे त्यास जमली नाहीत असा निष्कर्ष काढावा लागेल. परंतु रिडालोसच्या संघटनात्मक डाव्या राजकीय विचारधारेच्या पुरोगामी राजकीय पक्षांची एक संघटित शक्ती उभारली गेली असे म्हणावे लागेल. जे शेकापला एक नवी आशा दाखविण्यासाठी मदत करील अशी अपेक्षा वाटते.

या व्यतिरिक्त महाराष्ट्राच्या राजकारणात भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनता दल, समाजवादी पक्ष इ. राजकीय पक्षाचे अस्तित्वसुद्धा कार्यरत आहे. सुरुवातीच्या कालखंडात हे पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी होते पण नंतर आधुनिक कालखंडामध्ये या पक्षांचा प्रभाव कमी झालेला दिसतो. सध्याकालीन परिस्थितीमध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष इत्यादी राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे पक्ष आहेत. तसेच प्रादेशिक पातळीवर महाराष्ट्रात शिवसेना, मनसे, रिपब्लिकन पक्ष, शेकाप इत्यादी पक्ष आपले थोडे फार अस्तित्व टिकून आहेत. १९९५ च्या युती सरकारच्या अपवादानंतर महाराष्ट्रात सातत्याने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस सत्ताधारी पक्ष म्हणून कार्यरत आहेत.

**संदर्भः-**


१. डॉ. विठ्ठल मोरे, डॉ. कुसुम पवार, प्रा. राजशेखर सोलापुरे, डॉ. संग्राम मोरे - ‘‘महाराष्ट्र शासन आणि राजकारण, अरुणा प्रकाशन, लातूर-२०१०, पृ. २२६.

२. सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी - ‘महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल’, समकालीन प्रकाशन, पुणे-२००८, पृ. २३.

३. कित्ता, पृ. २६.

४. कुलकर्णी सुहास - ‘कॉंग्रेस पक्ष कोणाचा? राजकारण कोणाचे?’, समाज प्रबोधन पत्रिका, १९९९.

५. पळशीकर सुहास व नितीन बिरमल (२००४) - ‘महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ’, पुणे, प्रतिमा प्रकाशन.

६. सुहास पळशीकर व सुहास कुलकर्णी - ‘महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल’, समकालीन प्रकाश, पुणे -२००८, पृ. २९.

७. कित्ता, पृ. ९९.

८. डॉ. विठ्ठल मोरे, डॉ. कुसुम पवार, प्रा. राजशेखर सोलापुरे, डॉ. संग्राम मोरे - ‘‘महाराष्ट्र शासन आणि राजकारण, अरुणा प्रकाशन, लातूर-२०१०, पृ. २३६.

९. अनुभव मासिक, १९९८, आजचा भाजप, फेब्रुवारी.

१०. कुलकर्णी सुहास, १९९८, महाराष्ट्रात भाजप : वाघापासून बचाव हेच सूत्र, अनुभव मासिक, फेब्रुवारी.

११. बिरमल नितीन (१९९९) - ‘प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस’, समाज प्रबोधन, पत्रिका, पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर.

१२. सुहास पळशीकर व सुहास कुलकर्णी (२००८) - 'महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ. ५२.

१३. कित्ता, पृ. ५४.

१४. अकोलकर प्रकाशन, १९९८, जय महाराष्ट्र, मुंबई प्रभात.

१५. व्होरा राजेंद्र आणि सुहास पळशीकर (१९९६) - 'महाराष्ट्रातील सत्तांतर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

१६. डॉ. विठ्ठल मोरे, डॉ. कुसुम पवार, प्रा. राजशेखर सोलापुरे, डॉ. संग्राम मोरे - ''महाराष्ट्र शासन आणि राजकारण, अरुणा प्रकाशन, लातूर-२०१०, . पृ. २४०.

१७. कित्ता, पृ. २४२.

१८. कित्ता, पृ. २४४.

१९. कित्ता, पृ. २४६.

२०. पाटील राजेंद्र - 'रिपब्लिकन पार्टी : काल आणि आज', अजय प्रकाशन, *नागपूर, १९९७, पृ. २६.*

२१. कित्ता, पृ. ३०.

२२. सुहास पळशीकर व सुहास कुलकर्णी (२००८) - 'महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, पृ. १६५.

२३. कित्ता, पृ. १६८.

२४. घोटाळे विवेक (२००५) - 'महाराष्ट्रातील आघाड्याचे राजकारण', (एम.फिल., अप्रकाशित शोध प्रबंध), राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ. ५३.

२५. फडणीस जगन (१९७८) - 'शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण', कोल्हापूर अजब पुस्तकालय.